**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई -१**

---

# निवड यादीतील उमेदवारांना सूचना

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत पदभरतीची जाहिरात दि.२९/८/२०१४ व दि.१३/९/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर पदभरती प्रक्रियेत गुणवत्ता यादीनुसार नियुक्तीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत आली आहे.

उमेदवारांनी संबंधित पदासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, विविध खेळातील प्राविण्य प्रमाणपत्र, व इतर अधिकचे आवश्यक प्रमाणपत्र, ही सर्व मुळ प्रमाणपत्रे (ओरिजनल सर्टिफिकेट ) यांची अंतिम पडताळणी करण्यांत येणार आहे. त्यासोबतच सदर प्रमाणपत्राच्या प्रत्येकी २ छायांकित प्रती (ॲटेस्टेट/ सेल्फ अटेस्टेट ) सोबत असणे आवश्यक आहे.

**पडताळणी करीता कोणत्याही कारणास्तव गैरहजर राहील्यास व त्यांची पडताळणी न झाल्यास संबंधित उमेदवारांना निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. यानंतर यासंदर्भात कुठलाही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. पडताळणी करुन घेण्याची उमेदवारांची व्यक्तिशः जबाबदारी राहील याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोद घ्यावी.**

**उमेदवाराच्या अर्जातील दाव्याच्या तपासणीसाठी आवश्यक व योग्य ती प्रमाणपत्रे उमेदवार नियुक्ती प्राधिका-यांना सादर करु शकला नाही तर, उमेदवारास नियुक्ती देण्यात येणार नाही व उमेदवाराची निवड आपोआप रदद समजण्यात येईल. याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

निवड झालेल्या उमेदवाराने प्रादेशिक कार्यालयांतर्गत ज्या पदासाठी अर्ज केलेला होता. त्या प्रादेशिक कार्यालयाव्दारे त्यांच्या प्रमाणपत्राची **अंतिम तपासणी दि.२९ व ३०/६/२०१७ रोजी** संबंधित प्रादेशिक कार्यालयात करण्यांत येणार आहे. प्रमाणपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश संबंधित सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय यांच्याव्दारे त्याच दिवशी निर्गमित करण्यात येणार आहेत. सर्व संबंधितांनी प्रादेशिक कार्यालयात खालील वेळापत्रकाप्रमाणे प्रक्रियेसाठी उपस्थित रहावे.

**१) कनिष्ठ लिपिक-टंकलेखक पदे वगळून उर्वरित सर्व पदांची पडताळणी - दि.२९/६/२०१७ स.१०.०० वाजता**
**२) कनिष्ठ लिपिक- टंकलेखक पदांची पडताळणी - दि.३०/६/२०१७ स.१०.०० वाजता**

**शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी (इएसबीसी)आरक्षित पदावर अर्ज केलेल्या उमेदवारांची निवड प्रक्रिया सामान्य प्रशासन शासन शुध्दिपत्रक क्र. बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब दि. २/१२/२०१५ व न्यायालयीन प्रकरण ३१५१/२०१४ च्या अनुषंगाने स्वतंत्रपणे राबविण्यांत येईल. याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**सही/-**
**अध्यक्ष**
**गट क व ड पदभरती सनियंत्रण समिती,**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई-१**

D:\Add २०१४-१५\Add २०१४-१५ mew\Tippani.docx